# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

**अत्यंत महत्वाचे / कालमर्यादित :**
**परिपत्रक :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/माहिती/२०१९/ 2682
दिनांक : 28 JUN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणा-या सर्व
पदवी व पदव्युत्तर संस्था
(पुणे विभाग).

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तांत्रिक व्यावयासिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ :- १.मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई यांचे पत्र क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/५०६, दिनांक २८/०६/२०१९
२. प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक : तंशिप्र१२१९/प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५५८, दि.२५.०६.२०१९
३. प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक : तंशिप्र१२१९/प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५६५, दि.२६.०६.२०१९

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सुलभ संदर्भासाठी सदर पत्रांची छायांकित प्रत या सोबत जोडली आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षासाठी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत आहे.

पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत प्रवेश नियामक प्रधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळलि आहे. त्यानुसार या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनी दिनांक २९.०६.२०१९ रोजी, सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत माहिती भरावी. त्याकरीता प्रवेश नियामक प्राधिकरणाने http://technical.mahacet.org/ ही ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन दिलेली आहे सुलभ संदर्भासाठी या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेल्या संचालनालयाच्या पत्राची व प्राधिकरणाच्या सविस्तर सूचनांची प्रत सोबत जोडली आहे. **ऑनलाईन भरलेल्या माहितीचा प्रिंट व संस्था /अभ्यासक्रम मान्यतेच्या पत्रासह (अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद व इतर शिखर परिषद,तंत्र शिक्षण संचालनालय,संबधीत विद्यापीठ संलग्नता इत्यादि ) आपल्या संस्थेच्या दूतास खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.**

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक |
|---|---|---|
| १. | पुणे जिल्हयातील सर्व पदवी अभियांत्रिकी महाविद्यालये | २९.०६.२०१९ |
| २. | सातारा / कोल्हापूर / सांगली / सोलापुर जिल्हयातील सर्व पदवी अभियांत्रिकी महाविद्यालये व सर्व वास्तुशास्त्र संस्था | ३०.०६.२०१९ |
| ३. | पुणे विभागातील पुणे विभागातील सर्व औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्था / हॉटेल मॅनेजमेंट पदवी संस्था | ०१.०७.२०१९ |

आपल्या संस्थेने भरलेल्या माहितीच्या आधारे केंद्रीभूत प्रवेश देण्यात येणार असल्याने व सदरची माहिती प्रवेशासंबंधी असल्याने, माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेवून ती विहीत कालवधीत व अचूक असावी याबाबत दक्षता घेण्यात यावी. संस्थेने चुकीची माहिती भरल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास, त्यास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या सकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स – 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादा**

क्रमांक: २अ/एडीएम/२०१९/ ५०६
दिनांक : 2 8 JUN 2019

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.....

संदर्भ : प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक

३. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५५८, दिनांक २५.६.२०१९

४. तंशिप्र १२१९/ प्र.क्र.१२३/प्रनिप्रा/५६५, दिनांक २६.६.२०१९

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९-२० वर्षासाठी पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात येत आहे.

पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थाना शिखर परिषदांची मान्यता, संचालनालयाची मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नीकरण प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ती पडताळणी करण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार आपल्या विभागाच्या अधिनस्त असलेल्या पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी दिनांक २९.६.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर केलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने छाननी करुन ती माहिती आपल्या विभागाकडून दिनांक २.७.२०१९,सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रमाणित करण्यात यावी.

याबाबत संस्थांना http://technical.mahacet.org/ या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाइन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात आली असून या प्रणालीवर सर्व संस्थांना माहिती भरण्याबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी .

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत वेळापत्रकानुसार जागावाटप प्रदर्शित करण्याचा कालावधी विचारात घेऊन सदर काम विहीत कालमर्यादेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे ही बाब विचारात घेऊन प्रथम प्राधान्याने माहिती भरणे व त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात यावी. संस्थांची मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शवून त्यानुसार प्रवेश करण्यात येणार असल्यामुळे या माहितीची अचूक पडताळणी करण्यात यावी. चुकीची माहिती भरली गेल्यास व त्यानुसार प्रवेश प्रक्रियेमध्ये अडचणी उद्भवल्यास त्याची जबाबदारी आपणावर राहील याचीही नोंद घेण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा.सचिव,प्रवेश नियामक प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

E:\Budage\2019-20\General Correspondence\Letter to RO regarding verify the institute information within time.docx

All institutes which are conducting undergraduate and post graduate technical professional courses are hereby informed to check the correctness of already filled data or update their institute information related with courses approved for AY 2019-20 by AICTE/PCI/CoA (as applicable) through their Institute Login immediately.

All Institutes shall exercise the check/update activity with utmost care as the same data shall be processed for the allotment. The institute shall be responsible for incorrect allotment if the data checked/updated by the institutes is found not in conformity with the approvals given by the appropriate authorities.

The Institutes shall be able to update the following information for AY 2019-20 as given below:

1. Previous year Intake: (will be shown)
2. Intake as per the approval letter from AICTE,
3. Intake as per the approval letter from PCI/COA: (applicable for Pharmacy, Architecture courses)
4. Intake as per the GR,
5. Intake as per University affiliation,
6. Permanent Affiliation Intake as per University / Board
7. Intake as per the Hon. Court directives (if applicable)
8. Status for Accreditation, NRI, PIO
9. Course Affiliated to University
10. Participate in CAP: (Yes/No)
11. Court Remark (if any)
12. Upload Approval/Affiliation files/GR/Court order
13. Update Seat Surrender (if any)
14. Institute profile

Note: Intake 2019-20 Final Admission: (will be calculated automatically based on the above inputs)

**Instructions for Institutes (only for Undergraduate & Post Graduate Professional Courses)**

- Go to website http://technical.mahacet.org/
- Login with Institute code and password. (which you are using for logging in DTE Portal)
- view, check & update the data by **29 June 2019 upto 5 p.m.**
- Take Print and submit to respective RO for approval. (RO can edit/add course)
- RO shall verify the data & approve and shall issue acknowledgement.